RNI : MHMAR/25/A0848 Shikshanastra@gmail.com 79722 12030 79722 12030

# दैनिक शिक्षण अस्त्र

सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ अंक● १३७● ● किंमत १ रू ● ● पाने 2 ● संपादक : संदिप नारायण ठाकरे

# प्राध्यापकांच्या मानधनात वाढ

## पुणे विद्यापीठाच्या बैठकीत निर्णय; जागतिक दर्जाच्या नृत्यसंकुलास मान्यता

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने करार पद्धतीने नियुक्त होणा-या प्राध्यापकांच्या मानधनात 10 हजारांची वाढ केली आहे, तर 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत काम करणा-या विद्यार्थ्यांचे मानधन प्रति तास 55 रुपयांवरून 65 रुपये केले आहे. विद्यापीठ परिसरात सुमारे तीन एकर जागेवर जागतिक दर्जाचे नृत्य संकुल उभारण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली आहे.

विद्यार्थी कल्याण, शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. शनिवारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध योजनांना गती देण्याचा निर्णय झाला.

शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी करार पद्धतीने नियुक्त होणा-या प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. हे मानधन 40 हजारांवरून 50 हजार रुपये करण्यात येणार असून, त्यामुळे गुणवत्तापूर्ण अध्यापनाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील सेवा अधिक सक्षम करण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक यांच्याशी पुढील वर्षासाठी करार करण्यास मान्यता दिली असून, विद्यार्थ्यांना तातडीच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहेत.

### परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी समिती

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देऊन सन 2026-27 या शैक्षणिक वर्षासाठी अपघात सुरक्षा विमा योजना सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली असून, यासाठी 40 लाख रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे; तसेच विविध परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांना येणा-या अडचणींचा सखोल अभ्यास करून कायमस्वरूपी उपाय सुचवण्यासाठी डॉ. नितीन घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या आर्थिक अडचणी कमी करण्यासाठी 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत काम करणा-या विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रति तास 55 रुपयांवरून 65 रुपये असे मानधन वाढवण्यात येणार असून, या निर्णयामुळे विद्यापीठावर सुमारे एक कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू ठेवण्यासाठी मोठा आधार मिळणार असल्याचे मानले जात आहे.

सांस्कृतिक क्षेत्रालाही चालना देण्याच्या दृष्टीने भारतीय शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्थेच्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिसरात सुमारे तीन एकर जागेवर जागतिक दर्जाचे नृत्य संकुल उभारण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. या संकुलामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलावंत, संशोधक आणि विद्यार्थी यांच्यात संवादाची संधी निर्माण होणार असून, प्रयोगजीवी कलेला व्यासपीठ मिळणार आहे.

> विद्यार्थी हित, शैक्षणिक दर्जा उंचावणे आणि सांस्कृतिक विकास या तिन्ही बाबींचा विचार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नेहमी केला आहे. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय घेण्यात आले.
> **डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

### उपकेंद्राचे सक्षमीकरण


अहिल्यानगर सक्षमीकरणासाठी उपकेंद्राच्या शैक्षणिक समन्वयकपद निर्माण करून त्यावर नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे विद्यापीठ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अधिक प्रभावी दर्शन व्हावे यासाठी परिसर सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात येणार असून, यासाठी राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

# इंजिनीअरिंगच्या सीईटीचा निकाल मे अखेरीस

## दुस-या संधीसाठी नाव नोंदवलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : मुंबई : जेईईच्या धर्तीवर राज्याच्या सामायिक प्रवेश परीक्षांमध्येही (सीईटी) विद्यार्थ्यांना दोन वेळा संधी देण्याचा प्रयोग यंदा सीईटी कक्षाने केला असून, इंजिनीअरिंगसह महत्त्वाच्या अभ्यासक्रमांसाठीच्या सीईटीच्या पहिल्या संधीचा निकाल मेअखेरीस लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुस-या संधीसाठी नाव नोंदवलेल्या विद्यार्थ्यांना त्या सीईटीआधी पहिल्या सीईटीचे पर्सेंटाइल कळणार नाहीत.

यंदा 11 ते 20 एप्रिल या कालावधीत एमएचटी सीईटीच्या (पीसीएम गट) पहिल्या संधीची परीक्षा पार पडली, तर पीसीबी गटाची परीक्षा 11 ते 20 एप्रिल यादरम्यान सुरू आहे. या दोन्ही गटांच्या दुस-या संधीच्या परीक्षा अनुक्रमे 12 ते 16 मे आणि 10 ते 11 मे यादरम्यान नियोजित आहेत. पीसीएम गटाच्या पहिल्या




संधीच्या परीक्षेचा निकाल 40 दिवसांत म्हणजेच मेअखेरीस लागण्याची शक्यता उच्च व तंत्रशिक्षण विभागातील एका बड्या अधिका-याने व्यक्त केली.

'निकाल लवकरात लवकर लावण्याच्या दृष्टीने आमचे नियोजन सुरू आहे. दुस-या संधीच्या परीक्षेआधीच निकाल जाहीर व्हावेत, अशी आमचीही इच्छा होती. पण पहिल्या संधीसाठी साडेचार लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी बसले. एवढ्या विद्यार्थ्यांचे पेपर तपासून निकाल तयार करण्यासाठी 40 दिवसांचा अवधी लागणार आहे. त्यामुळे हा निकाल दुस-या संधीच्या परीक्षेनंतरच जाहीर होईल', असे या अधिका-याने

# केंद्रप्रमुख'च्या टिईटि अटीबाबत पुन्हा संभ्रम

## सर्वोच्च न्यायालयाचा 'यथास्थिती'चा आदेश

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : मुंबई : 'केंद्रप्रमुख' या पदावर पदोन्नती मिळण्याकरिता 3 व 4 फेब्रुवारी रोजी मर्यादित विभागीय स्पर्धात्मक परीक्षा दिलेल्या शिक्षकांना टीईटी/सीटीईटी पात्रतेची अट कोणत्या तारखेपासून लागू असायला हवी, असा संभ्रम या रखडलेल्या प्रक्रियेत निर्माण झाल्याने मुंबई उच्च न्यायालयाने एक वेळचा तोडगा म्हणून 10 एप्रिल रोजी अंतिम निकाल दिला होता. मात्र, त्याला अपिलाद्वारे आव्हान देण्यात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या पदोन्नतीच्या प्रक्रियेला नुकताच 'यथास्थिती'चा हंगामी आदेश दिला आहे. त्यामुळे या प्रश्नावर पुन्हा एकदा संभ्रम निर्माण झाला आहे.

'केंद्रप्रमुख' या पदावरील पदोन्नतीसाठी राज्यभरातील 38 हजार 558 शिक्षकांनी ही परीक्षा दिली. मात्र, गेल्या सुमारे सहा वर्षांपासून पदोन्नतीची ही प्रक्रिया रखडलेली असतानाच टीईटीच्या पात्रतेची अट बंधनकारक असल्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या 1 सप्टेंबर 2025 रोजीच्या निकालाने शिक्कामोर्तब झाले. त्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकार व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांमुळे गुंतागुंत वाढून कायदेशीर पेच निर्माण झाला होता.

# 9 मेपासून होणार 'पेट'ला सुरुवात

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्यावतीनेघेण्यात येणारी पीएचडीसाठीची 'पेट' ही प्रवेशपरीक्षा 9 ते 12 मेदरम्यान घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत 23 एप्रिल रोजी संपली आहे. पीएचडी अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी नागपूर विद्यापीठाच्यावतीने 'पेट' ही प्रवेशपरीक्षा घेण्यात येते. 10 ते 23 एप्रिलदरम्यान या परीक्षेचे ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यात आले होते. अर्जाची छापील प्रत सादर करण्यासाठी 27 एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जांची पडताळणी 30 एप्रिलपर्यंत करण्यात येईल. विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेची प्रवेशपत्रे त्यांच्या लॉगिनमध्ये 3 मे रोजी उपलब्ध करण्यात येतील. प्रवेशपत्र ई-मेल आयडीवर पाठविले जाणार नाहीत, असे विद्यापीठाने कळविले आहे.

# जिल्ह्यातील 162 केंद्रावर शिष्यवृत्ती परीक्षा सुरळीत

## जिल्ह्यातील चौथी परीक्षेसाठी 90 तर सातवी परीक्षेसाठी 72 परीक्षा केंद्र

## 1 हजार 56 विद्यार्थी अनुपस्थित

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना : (ता.26) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात येत असलेल्या इयत्ता चौथी आणि सातवी शिष्यवृत्ती परीक्षा रविवारी जिल्हातील केंद्रावर सुरळित पार पडल्या असल्याची माहितीप्राथमिकशिक्षणविभागानेदिलीआहे.

शहरासह जिल्हातील चौथी परीक्षेसाठी 90 तर सातवी परीक्षेसाठी 72 परीक्षा केंद्र होती. प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवी परीक्षेचे नियोजन करण्यात आले होते.



जिल्हा परीक्षा नियंत्रक शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगीता भागवत व उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे यांच्यासह अधिकारी पथकांनी परीक्षा केंद्रावर भेटी देवून पाहणी करतांना

या परीक्षेत वर्ग 4 थी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी 12 हजार 163 विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. त्यापैकी 11 हजार 648 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. चौथीच्या परीक्षेत 515 विद्यार्थी अनुपस्थित होते. इयत्ता 7 वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी 9 हजार 756 विद्यार्थी परीक्षेसाठी नोंदणी झाले होते त्यापैकी 9 हजार 214 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर 541 विद्यार्थी अनुपस्थित होते.

सदर परीक्षा दरम्यान जिल्हा परीक्षा नियंत्रक शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगीता भागवत व उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे यांच्यासह अधिकारी पथकांनी परीक्षा केंद्रावर भेटी देवून पाहणी केली. परीक्षा कामकाज नियोजन पी.एस. रायमल व कल्याण गव्हाणे यांच्या पथकांनी केले.

---

# यशाचा मास्टर स्ट्रोक - एका प्रयत्नात 5 विद्यार्थ्यांना NMMS शिष्यवृत्ती!

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना: जालना (प्रतिनिधी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वरुड केंद्र वखारी (ता. जालना, जि. जालना) येथील शिक्षक श्री. सावता भरतराव तांबेकर यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना घडवलेले यश उल्लेखनीय ठरले आहे. शाळेच्या इतिहासात प्रथमच एका प्रयत्नात तब्बल पाच विद्यार्थी NMMS ( National Means -cum-Merit Scholarship) शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून प्रत्येक विद्यार्थ्याला सुमारे 48,000 रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशामागे श्री. तांबेकर सर यांनी घेतलेले अथक परिश्रम, नियमित सराव परीक्षा व



नेहा अलंकार



दर्शन पंगुडवाले



ऋतुजा सातपुते



हर्षदा वाहुळे



यशवंत खरात




विद्यार्थ्यांना दिलेले दर्जेदार मार्ग दर्शन हे महत्त्वाचे ठरले. या परीक्षेत कु. नेहा गजानन अलंकार हिने एनटिबी प्रवर्गातून जिल्हात प्रथम क्रमांक मिळवला असून दर्शन दीपक पंगुडवाले याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तसेच एससी प्रवर्गातून हर्षदा गौतम वाहूळे, ऋतुजा राहुल सातपुते व यशवंत परमेश्वर खरात हे विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले आहेत. या यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री. मनोज कोल्हे, बीट विस्तार अधिकारी श्रीमती गीता नाकाडे तसेच केंद्रप्रमुख श्री लक्ष्मण देशमुख यांनी मार्ग दर्शन व सहकार्य दिले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक व पालक यांच्या सहकार्याबद्दल श्री. तांबेकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. गाव व शाळेचे नाव उज्ज्वल करणा-या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.



मार्गदर्शक
सावता तांबेकर

---

# जिल्ह्यातील शाळांना आमदार निधीतून संगणक

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : जालना : मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी गुरुवारी जालना येथील शासकीय विश्रामगृह येथे शिक्षक, प्राध्यापकांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडणी जाणून घेतल्या. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक यावर्षी अखेर होणार असून सध्या पदवीधर मतदारांची नाव नोंदणी सुरू असल्याने या नाव नोंदणीची आढावा देखील यावेळी घेण्यात आला. जालना जिल्हातील जवळपास सर्वच शाळांना आमदार निधीतून संगणक दिले असून राहिलेल्या शाळांना देखील लवकरच संगणक वितरीत करण्यात येतील. शाळांना संगणक वाटप करतांना कुठलेही राजकारण न करता केवळ विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आजपर्यत संगणक वाटप केले असल्याचे आमदार चव्हाण यांनी सांगितले.यावेळी शिक्षक, प्राध्यापकांच्या शिष्टमंडळाचे प्रलंबित प्रश्न समजून घेत संबंधित अधिका-यांना फोनव्दारे काही प्रश्न तात्काल सोडवण्यात आले



तर काही प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे आ. चव्हाण यांनी सांगीतले. आगामी पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राहिलेल्या जास्तीत जास्त पदवीधर मतदारांनी नाव नोंदणी करावी असे आवाहन देखील यावेळी आ. चव्हाण यांनी केले. याप्रसंगी डॉ. शिवाजीराव मदन, प्राचार्य राजेंद्र गायकवाड, प्राचार्य भारत खंदारे, पांडुरंग खराबे, ज्ञानेश्वर टेकाळे, उध्दवराव म्हस्के, पवन जोशी, उध्दवराव पवार, रामचंद्र जाधव, अॅड. कय्युम, बाळासाहेब आबुज, ज्ञानेश चव्हाण, रवींद्र दळवी, प्रा. संजय राऊत, प्रा. तुळशीराम शेवाळे, विष्णु गायकवाड, रमेश वारे, प्रा. संदीप पाटील, इंद्रजीत जाधव, रमेश शिंदे, मिलिंद तायडे, नंदू आडे आदींसह शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शैक्षणिक वर्षासाठी नियोजन बैठक

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : घनसावंगी : घनसावंगी तालुक्यातील रांजणी बीटमधील केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांची आगामी शैक्षणिक वर्ष 2026-27 ची नियोजन बैठक रांजणी येथील सरस्वती भवन विद्यालयात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी अशोक सोळंके हे होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रप्रमुख पवार, डोळझाके, दिलीप महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. 1 मे 2026 रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शाळांमध्ये नवीन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. 6 वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक बालकाला शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी मुख्याध्यापकांनी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. या दिवशी विद्यार्थ्यांचा सत्कार करून पालक आणि शाळा व्यवस्थापन



समितीची संयुक्त सभा घेण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. 15 जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी शाळांमध्ये खालील सुविधा सुसज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वतंत्र स्वच्छतागृहे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्पची उपलब्धता, शाळा परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवणे आदी पायाभूत सुविधांवर भर द्यावा असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

## माया गायकवाड याना 'स्त्री प्रेरणा' पुरस्कार

जालना : येथील सामाजिक कार्यकर्त्या माया गायकवाड यांना दिनांक 24 एप्रिल रोजी पोतदार इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने मदर डेचे औचित्य साधून 'स्त्री प्रेरणा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यांप्रसंगी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जालना शहराचे उपम हापौर राजेश राऊत, पोतदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य, उपप्राचार्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

माया गायकवाड या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जिल्हा महिला कार्यवाह म्हणून अनेक वर्षा पासून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करत आहेत. याशिवाय महिलांना सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून महिलांसाठी मोफत विवीध कोर्स आयोजित करून अनेक महिला प्रशिक्षित होऊन स्वतःच्या पायावर उभे राहिलेल्या आहेत. त्यांच्या या पुरस्काराबद्दल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पदाधिकारी यांच्या वतीने राज्य कार्यकारी समिती सदस्य मधुकर गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गिराम विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

Publisher and Owner Sandeep Narayan Thakre Printer Santosh Vishnu Bhutekar at Jagmitra offset, Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna 431203 ( Maharashtra ) Place of publication office Daily Shikshan Astra, Plot No.11, Varsha Niwas, Sukh-shanti Nagar Mantha Road, Jalna. 431203 ( Maharashtra ) Editor : Sandeep Narayan Thakre, 7972212030 RNI MHMAR/25/A0848 Email. Shikshanastra@gmail.com Advisory Body Adv.Adinath Kadam & Adv.Yogesh Somani, .

हे पत्र प्रकाशक, मालक संदिप नारायण ठाकरे यांनी मुद्रक संतोष विष्णु भुतेकर यांच्या जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजीनगर, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे छापुन दैनिक शिक्षण अस्त्र, कार्यालय प्लॉट नं 11, वर्षा निवास, सुख शांती नगर, मंठा रोड, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले आहे. संपादक ः संदिप नारायण ठाकरे या अंकात प्रसिध्द झालेले मजकुर लेख व त्यामधुन होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. सर्व वाद जालना न्यायालया अंतर्गत आर एन आय MHMAR/25/A0848 कायदेशीर सल्लागार ः अॅड.आदिनाथ राम कदम व अॅड.योगेश गणेश सोमाणी